४. कागदपत्रे जोडणे (Technical Requirements): दरपत्रकासोबत खरेदीदाराने खालील कागदपत्रांच्या छायांकित प्रती जोडणे बंधनकारक आहे:पॅन कार्ड (PAN Card) आणि आधार कार्ड (Aadhaar Card).व्यावसायिक परवाना (गुमास्ता / सुयोग्य व्यवसाय परवाना असल्यास).जीएसटी (GST) नोंदणी प्रमाणपत्र (लागू असल्यास). आपल्या संस्थेचे या कार्यालयातील कोणत्याही अधिकारी /कर्मचारी यांच्याबरोबर हितसंबंध नाहीत याबाबत प्रमाणपत्र दरकरारा सोबत जोडावे.

५. साहित्य उचलण्याची मुदत: कंत्राट मंजूर झाल्याचा आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांच्या आत संपूर्ण रक्कम रुग्णालयाच्या रोख विभागात शासकीय चलनाद्वारे जमा करून सर्व कॅन स्वखर्चाने रुग्णालयाच्या आवारातून वाहून नेणे बंधनकारक राहील. वेगळे भाडेशुल्क दिले जाणार नाही

६. प्रदूषण नियंत्रण मंडळाचे नियम: सदर साहित्य हे प्लास्टिक स्क्रॅप असल्याने, खरेदीदाराने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (MPCB) प्लास्टिक विल्हेवाट व रिसायकलिंग नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

७. हक्क राखीव: कोणतेही कारण न देता प्राप्त झालेली सर्व किंवा एखादे दरपत्रक मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अंतिम अधिकार वैद्यकीय अधीक्षक, उपजिल्हा रुग्णालय, पनवेल यांनी स्वतःकडे राखून ठेवला आहे. इच्छुकांनी वरील दरपत्रके सीलबंद लिफाफ्यात वैद्यकीय अधीक्षक महराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालय पनवेल जि. रायगड या नावाने सादर करावीत . प्रत्येक फर्मला फक्त एकच दरपत्रक देण्याची परवानगी आहे. लिफाफ्यावर ज्या बाबींसाठी दरपत्रके सादर करत आहेत त्या बाबींचा स्पष्ट उल्लेख नमूद करावा.

डॉ. शिवाजी एस. पाटील
वैद्यकीय अधीक्षक वर्ग - १
महाराष्ट्र भूषण'नानासाहेब धर्माधिकारी
उपजिल्हा रुग्णालय पनवेल जि. रायगड.

महाराष्ट्र शासन आरोग्य सेवा

वैदयकिय अधिक्षक,

महाराष्ट्र भूषण डॉ.नानासाहेब धर्माधिकारी

उपजिल्हा रुग्णालय पनवेल जि.रायगड

पत्ता:- वाल्मिकी नगर, नित्यानंद मार्ग ,पनवेल (प) पिन कोड - ४१०२०६

E-mail :- rhpanvel@gmail.com Ph no :- 022- 27453398

जा.क्र.उ.जि.रू. पनवेल/ कॅनची विक्री करण्यासाठी दर निश्चिती दरपत्रके जाहीर नोटिस/1835/२०२६

दिनांक : ०७/०७/२०२६

# जाहीर नोटिस

सूचित करण्यात येते की , वैद्यकीय अधीक्षक , महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालय पनवेल जि. रायगड कार्यालयामार्फत सोबत दिलेल्या उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथील डायलिसिस विभागामध्ये रुग्णांच्या उपचारादरम्यान जमा झालेले हिमोडायलिसिस सोल्यूशनचे (Haemodialysis Solution) अंदाजे ५००० रिकामे प्लास्टिक कॅन (कंटेनर्स) जसे आहे तसे या स्थितीमध्ये विक्री करावयाचे आहेत. त्याकरिता इच्छुक भंगार व्यावसायिक/अधिकृत रिसायकलर्स यांच्याकडून सीलबंद पाकिटात प्रति कॅन (Per Can) दरपत्रके मागवण्यात येत आहेत.

दरपत्रक फॉर्म मिळण्याचा/स्वीकारण्याचा कालावधी: दिनांक ०७/०७/२०२६ ते दिनांक २७/०७/२०२६ (कार्यालयीन वेळेत सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत). दरपत्रक उघडण्याचा दिनांक व वेळ: दिनांक २८/०७/२०२६ (दुपारी ३:०० वाजता - वैद्यकीय अधीक्षक यांच्या कक्षात).

नियम आणि अटी :

१. शासन निर्णयाचा संदर्भ: ही विक्री प्रक्रिया वित्त विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम (भाग-२) च्या नियमांनुसार व मार्गदर्शक तत्वांच्या अधीन राहून राबवली जात आहे.

२. दर सादर करण्याची पद्धत: इच्छुक खरेदीदाराने आपले दरपत्रक सीलबंद पाकिटात सादर करावे. पाकिटावर "डायलिसिस विभागातील रिकाम्या कॅन खरेदीसाठीचे दरपत्रक" असे स्पष्ट अक्षरात लिहिलेले असावे.

३. सर्वोच्च दराची निवड (H1 Basis): प्राप्त झालेल्या वैध दरपत्रकांपैकी ज्या खरेदीदाराचा दर प्रति कॅन सर्वात जास्त (Highest 1 - H1) असेल, त्यालाच हे कॅन खरेदी करण्याची परवानगी दिली जाईल.